पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०


◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जा.क्र.पुअहोसोविसो/प.व मू.मं./फोटोकॉपी विभाग/२०२४/ 54 दिनांक : 11/01/2024

## परिपत्रक -02

विद्यापीठाशी संलग्नित असणा-या सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टो/नोव्हें-२०२३ च्या सत्रापासून बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील सर्व विषयांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्यात येत असल्याने सदरच्या अभ्यासक्रमातील सर्व विषयांच्या परीक्षेकरीता विद्यार्थ्यांना द्याव्या लागणार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) आणि त्यानंतर होत असलेल्या उत्तरपत्रिकांच्या पूनर्मूल्यांकन (Revaluation) चे काम महाविद्यालयस्तरावर करण्याबाबत यापूर्वी कळविण्यात आलेले आहे.

बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी., बी.बी.ए. व बी.सी.ए. या पाच अभ्यासक्रमातील द्वितीय व तृतीय वर्षातील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांच्या ईमेल-आयडीवर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याकरीता विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामार्फत खालीलप्रमाणे विद्यापीठाकडे विहीत वेळेत अर्ज करणे बंधनकारक आहे.

**१.** Ordinance O.106(B) 2015 अन्वये वरील अभ्यासक्रमातील विषयाचा निकाल लागल्यापासून १५ दिवसापर्यंत विद्यार्थीकडून फोटोकॉपीसाठीचे शुल्क रु.२००/- (प्रती विषय) आकारुन पुढील तीन दिवसात विद्यापीठाकडे एकुण शुल्कासहं जमा करावेत. नियमानुसार **प्रती सत्र केवळ दोन विषयांच्या** उत्तरपत्रिकांचे फोटोकॉपी विद्यार्थ्यास उपलब्ध करुन देण्यात येईल.

**२.** सदर विषयांचे उत्तरपत्रिकाची/फोटोकॉपीचे पूनर्मूल्यांकन करावयाचे असल्यास सदर विद्यापीठाकडुन रु.५००/- शुल्क आकारुन एकुण (उत्तरपत्रिकाची/फोटोकॉपी मिळाल्यानंतर ७ दिवस पर्यंत) शूल्कासह विद्यापीठासह जमा करावेत.

**३.** उपरोक्त प्रमाणे फोटोकॉपी/पुनर्मल्याकंनाचे अर्ज महाविद्यामार्फतच घेण्यात येणार आहे. कोणत्याही परिस्थतीत विद्यार्थ्यांना या विभागाकडे पाठवू नये.

**टिप :** ज्या सेम -५ च्या फोटोकॉपीची मुदत दि : ११/०१/२०२४ पुर्वी संपलेली आहे त्यांना दि : १७/०१/२०२४ पर्यंत अंतिम मुदत विद्यार्थ्यांसाठी देण्यात येत आहे. तरी विद्यार्थ्यांचे फोटोकॉपीचे अर्ज महाविद्यालयानी दि : १९/०१/२४ पर्यंत विद्यापीठाकडे सादर करावेत.

(डॉ.एम.एस.रोकडे)
**प्र-संचालक**